नि.फौ.ख.क्र.९८/२०२२
निशाणी ५७

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा पुरावा**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – एकनाथ भाऊराव आव्हाड
वय – ५९ वर्षे,
व्यवसाय – सेवानिवृत्त, पोलीस उपनिरीक्षक
राहणार – केडगाव, ता. जि. अहमदनगर

**सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एस. गांधले**

दि. ३१/१२/२०२१ रोजी मी राहुरी पोलीस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी कर्तव्यावर असताना फिर्यादी भुषण पाटोळे हे पोलीस स्टेशन येथे आले व त्यांनी सांगितले की, दि. ३०/१२/२०२१ रोजी मी घरासमोर असताना चुलते देवधर भास्कर पाटोळे व चुलत भाऊ हे तेथे आले. त्यांनी 'घरकुलाला अडथळा का आणता', असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यांच्या सांगण्यानुसार मी फिर्याद नोंदवुन घेतली. त्याप्रमाणे मी गुन्हा दाखल केला. त्यानंतर वरिष्ठांच्या तोंडी आदेशानुसार मी गुन्ह्याचा तपास केला. दि. ०१/०१/२०२२ रोजी दोन पंचांना घेवुन घटनास्थळी जावुन घटनास्थळाचा पंचनामा नोंदवला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी तसेच दोन पंचांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५८** देण्यात येते. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे गुन्ह्यासंदर्भात तपासटिपण नोंदवले. तपासादरम्यान दि. ०५/०१/२०२२ रोजी गुन्ह्यातील आरोपी क्र. १ ते ३ यांना फौ. प्र. सं. ४१ (१)(ब) नुसार नोटीस दिली. आता मला सदरची नोटीस दाखवण्यात आली. त्यावर माझी तसेच तीनही आरोपीची सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५९** देण्यात येते. तपासादरम्यान मी वैद्यकीय अधिकारी यांना फिर्यादी व जखमी साक्षीदार यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला. आता मला वैद्यकीय अधिकारी यांना दिलेले पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे व मिळाल्याबाबतची वैद्यकीय कार्यालयातील नोंद आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६०** देण्यात येते. पत्राच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन फिर्यादी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले ते मी दोषारोप पत्रात सामिल केले. त्यानंतर गुन्हा घडला त्या अनुषंगाने गुनह्याच्या ठिकाणी दगड मिळुन आला तो मुद्देमाल कारकुन

यांच्याकडे जमा करुन मुद्देमाल पावती हस्तगत केली. आता मला मुद्देमाल पावती दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६१** देण्यात येते. तपासादरम्यान आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा मिळुन आल्याने मी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायलयात हजर आहेत. (आरोपी क्र. २ व ३ यांचा हजेरी गैरमाफीचा अर्ज ओळखीबाबत आक्षेप घेणार नाही, या अटीवर मंजुर करण्यात येतो.)

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर. एम. उंडे यांच्यामार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद मी नोंदवली व गुन्ह्याचा तपास मी केला. फिर्याद नोंदवुन घेण्याबद्दल मला वरिष्ठांनी सांगितले नव्हते. फिर्याद उशिरा देण्याबाबतचे कारण फिर्याद नोंदवताना मी फिर्यादीला विचारले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद देताना फिर्यादीचे वडील देखील सोबत आले होते. देवदत्त भास्कर पाटोळे हे फिर्यादीचे वडील आहेत. रोहन पाटोळे हा फिर्यादीचा भाऊ आहे व निकीता पाटोळे ही फिर्यादीची पत्नी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी यांचे वडील, भाऊ व पत्नी यांच्या व्यतिरिक्त कोणाचेही जबाब घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, देवदत्त भास्कर पाटोळे हे पोलीस डिपार्टमेंटमध्ये कार्यरत होते व ते सेवानिवृत्त झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, देवदत्त भास्कर पाटोळे हे पोलीस डिपार्टमेंटमध्ये कार्यरत होते त्यामुळे त्यांच्या सांगण्यानुसार लिहुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे व आरोपीचे घर हे एकमेकांच्यासमोर आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपीच्या घराच्या शेजारी राहुरी–देसवंडी हा रस्ता आहे. सदरचा रस्ता हा वरदळीचा आहे, हे मला सांगता येणार नाही. पंचनामा करतेवेळी मी घराचा सर्वे नंबर व घर नंबर पाहिला नव्हता. तपासादरम्यान फिर्यादी व आरोपी यांना त्यांच्या घराच्या नंबरबद्दल विचारले होते, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त करण्यात आलेला दगड यासारखे दगड हे फिर्यादी व आरोपी यांच्या घरासमोर पडलेले असतात. जप्त करण्यात आलेला दगड हा मी न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेकडे पाठवला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे वडील हे पोलीस डिपार्टमेंटमध्ये कार्यरत असल्यामुळे मी खोटी फिर्याद घेतली व खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनेबाबत लावण्यात आलेली कलमे ही फिर्यादीच्या वडीलांच्या सांगण्यानुसार मी फिर्यादीमध्ये नोंदवली व त्यांच्या

सांगण्यानुसार जबाब नोंदवला. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देताना फिर्यादीने विशिष्ट शिवीगाळ सांगितली नव्हते. फिर्यादीने फिर्याद देताना आरोपीने 'तुझा बेत पाहु', याबाबत विशिष्ट सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/१२/२०२१ रोजी कोणतीही घटना घडली नाही. मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद नोंदवुन, खोटा तपास करुन खोटे शपथपत्र दाखल केले.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.07.30 14:52:29 +0530

(**श्री. पी. एच. पाटील**)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.३,राहुरी

राहुरी
दिनांक – ३०/०७/२०२६.